नागपूर येथे आंतरराष्ट्रीय प्रवासी व माल वाहतूक हब विमानतळ विकसित करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र. एव्हीएन-१००१/(प्र.क्र.१०५/२००१)/२८-अ
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :- ४ जानेवारी, २००२.

वाचा:- १) शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र. खाद्रेसं-२०००/१२/रस्ते-८, दिनांक २ मे, २०००.
२) शासन परिपत्रक क्र. एव्हीएन-२००१/(प्र.क्र.६९/२००१)/२८-अ, दिनांक ८ जून, २००१.
३) शासन निर्णय क्र. एव्हीएन-१००१/(प्र.क्र.६९/२००१)/२८-अ, दिनांक १ ऑक्टोबर, २००१.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासनाने नागपूर येथे आंतरराष्ट्रीय प्रवासी व माल वाहतूक हब विमानतळ विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. शासन आदेश सीआयडी/१०९९/प्र.क्र.१७/९९/नवि-१०, दिनांक ३०.०३.२००० अन्वये हा प्रकल्प विकसित करण्यांकरिता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. नागपूर येथील आंतरराष्ट्रीय प्रवासी व माल वाहतूक हब विमानतळाच्या प्रकल्पाचा शक्याशक्यतेचा अभ्यास करण्याचे काम सल्लागारांमार्फत करण्याचे आदेश महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास देण्यात आलेले होते. त्यानुसार सल्लागार मेसर्स एल्.अँड.टी. रॅमबोल यांच्या नेतृत्वाखालील सल्लागारांच्या चमुने (Consortium of consultants) प्रकल्पाचा सखोल अभ्यास करुन अहवाल सादर केलेला आहे. शासनाने दि. २०.१२.२००१ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सल्लागारांनी सादर केलेल्या अहवालातील शिफारशींना मान्यता देऊन नागपूर येथील आंतरराष्ट्रीय प्रवासी व माल वाहतूक हब विमानतळाच्या प्रस्तावास खालीलप्रमाणे मंजूरी दिलेली आहे.

१. नागपूर येथे अस्तित्वात असलेल्या विमातळासहीत एक आंतरराष्ट्रीय बहुविध प्रवासी कार्गो हब विमानतळाचा एकात्मिक विकास "बांधा - वापरा व हस्तांतरीत करा" (B.O.T.) तत्वावर करण्यात यावा. यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने नोडल एजन्सीचे काम पहावे.

२. या प्रकल्पासाठी अस्तित्वात असलेल्या विमानतळाच्या जमिनीव्यतिरिक्त अंदाजे २५५६ हेक्टर जमीन संपादन करावयाची आहे. यासाठी खर्च अंदाजे रु.२००.कोटी इतका आहे. त्याकरिता महाराष्ट्र शासन हा निधी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास

महामंडळास उपलब्ध करुन देईल. तसेच यापैकी, सिडकोच्या मेघदूत प्रकल्पात येणारी व संपादनाच्या अंतिम टप्प्यात पोहोचलेली ९६५ हेक्टर जमीन संपादनाचा खर्च अंदाजे रुपये ४४ कोटी इतका आहे. हा खर्च महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत करण्यात येणार आहे. सदर खर्चाची प्रतिपूर्ती शासनाकडून एप्रिल २००२ पर्यन्त महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास करण्यात यावी. उर्वरित ज़मिनीचे संपादन करण्यासाठी भूसंपादन कायद्याच्या कलम ४ अन्वये लवकरात लवकर अधिसूचीत करण्यात येऊन त्यासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद पुढील दोन आर्थिक वर्षात करण्यात यावी. तसेच संरक्षण मंत्रालयाच्या ताब्यात असलेली व विमानतळ प्रकल्प क्षेत्रात येत असलेली जमीन या प्रकल्पाकरिता घेऊन मोबदल्यात दुसरी जमीन संरक्षण मंत्रालयास देण्यात यावी.

३. आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांना तसेच नागपूर शहर व भारतावरुन उड्डाण करणाऱ्या विमानांना नागपूर विमानतळावर, द्वीपक्षीय कराराशिवाय उतरता यावे व विमानतळाचा वापरा करता यावा यादृष्टीने मुक्त संचार धोरणाअंतर्गत (Open Sky Policy) नागपूर विमानतळ, आंतरराष्ट्रीय प्रवासी व कार्गो हब प्रवेशद्वार (Gateway) विमानतळ म्हणून घोषित करण्याकरिता केंद्र शासनाच्या नागरी उड्डाण मंत्रालय व इतर संबंधीत मंत्रालयांकडे राज्य शासनामार्फत पाठपुरावा करण्यात यावा.

४. हब विमानतळ म्हणून, नागपूर विमानतळाचा वापर सुकर व्हावा व त्यानुसार मूल्यवर्धक व आर्थिक उलाढालीचा विकास करण्याच्या दृष्टीने या प्रकल्पांचे क्षेत्र विशेष आर्थिक क्षेत्र किंवा मुक्त व्यापार क्षेत्र (Special Economic Zone/Free Trade Zone) म्हणून घोषित करण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा. याबाबतीत केंद्र सरकारकडून आर्थिक सहाय्य मिळविण्याचेही प्रयत्न करावे.

५. या प्रकल्पाची अंमलबजावणी जलद गतीने करता यावी म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सिडको, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यासारख्या व अन्य वित्तिय संस्थांची तसेच वापर करणाऱ्या संस्थांची भागीदारी असलेली एक विशेष उद्देश कंपनी (Special Purpose Company) जीचे नाव महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी हे असेल, गठीत करावी, तसे अधिकार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला देण्यात यावे. ही कंपनी प्रकल्पाचे कार्यान्वयन, खाजगीकरणातून व प्रकल्पाकरिता एक खास कंपनी जसे नागपूर विमानतळ विकास कंपनी (NADC) च्या माध्यमातून हाती घेईल. या कंपनीतील मुख्य भागीदारी ही खाजगी गुंतवणूकदारांची असेल व हे गुंतवणूकदार हा प्रकल्प "बांधा - वापरा व हस्तांतरीत करा" (B.O.T.) या तत्वावर राबवतील.

६. या प्रकल्पांतर्गत येणाऱ्या विविध सेवा, सुविधा व इतर सोयींचे नियोजन व विकास जलद गतीने करणे सुकर व्हावे म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला या प्रकल्पाकरिता MRTP ॲक्टच्या अंतर्गत विशेष नियोजन प्राधिकरण (Special Planning Authority) म्हणून घोषित करण्यात यावे.

७. या प्रकल्पाचे नियोजन व विकास करण्याकरिता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने विविध क्षेत्रातील अभियंते व अधिकारी यांची नेमणूक करुन २१ सदस्यांचा खाली दर्शविल्याप्रमाणे एक प्रकल्प गट निर्माण करावा.

| | | |
|---|---|---|
| १. | महाव्यवस्थापक (मुख्य अभियंता दर्जा) | - १ |
| २. | अधिक्षक अभियंता (प्रवासी वाहतुक) (अधिक्षक अभियंता दर्जा) | - १ |
| ३. | अधिक्षक अभियंता (स्थापत्य) | - २ |
| ४. | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | - ४ |
| ५. | नगर रचनाकार | - १ |
| ६. | वास्तुशास्त्रज्ञ | - १ |
| ७. | कार्यकारी अभियंता (विद्युत) | - १ |
| ८. | कार्यकारी अभियंता (दूरसंचार) | - १ |
| ९. | परिव्ययलेखाकार व वित्तीय विश्लेषक (का.अ. दर्जा) (Cost Accountant/Financial Analyist EE Level) | - १ |
| १०. | पणन अधिकारी (कार्यकारी अभियता दर्जा) | - १ |
| ११. | उच्च श्रेणी/निम्न श्रेणी लघुलेखक | - ४ |
| १२. | CAD Operator | - १ |
| १३. | शिपाई | - १ |
| १४. | वाहनचालक | - १ |
| | एकूण | - २१ |

तसेच प्रकल्प राबवितांना आवश्यकतेप्रमाणे या प्रकल्पगटाचा आकार वाढविण्याचे अधिकार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला प्रदान करण्यात यावेत. या प्रकल्प गटावरील व इतर आस्थापनांवरील खर्च प्रकल्प खर्चाच्या ५ टक्क्यापेक्षा जास्त नसावा अशी काळजी महामंडळाने घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(के. नलिनाक्षन)
प्रधान सचिव (विमानचालन), महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई,

-- ४/ --

GAD/G.2 No A.V.N.f 1001/C.No.103/2001/28-A.
dt. 4-1-2002

- ४ -

२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.खा. विलास मुत्तेमवार (लोकसभा सदस्य), नागपूर,
५. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
६. प्रधान सचिव (विमानचालन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
७. प्रधान सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
८. प्रधान सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
९. प्रधान सचिव (नगर विकास) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नेपीयन सी रोड, मुंबई,
११. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नेपीयन सी रोड, मुंबई,
१२. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर,
१३. आयुक्त, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर,
१४. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर,
१५. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी नागपूर यांचे कार्यालय, नागपूर,
१६. निवड नस्ती.